भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र .८१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १७/१२/२०१७

**१) गैरकायदयावी मंडळी जमवुन दुकानातील सामान बाहेर फेकुन ईमारत पाडुन गल्यामधील नगदी पैसे चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १३/१२/२०१७ चे १४.३० वाजता दरम्यान यातील आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवुन आरोपी क्र. ०१ याने दिलेल्या चिथावनी वरुन फिर्यादीचे ताब्यातील दुकानात बेकायदेशीररित्या प्रवेश करुन फिर्यादीचे दुकानातील सामान बाहेर फेकुन सामानाची नुकसान करुन दुकानाची ईमारत पाडुन बाहेर फेकलेल्या लाकडी कॉवुन्टर गल्यामधील नगदी रक्कम चोरुन घेवुन गेल्याने फिर्यादी दिपक दशरथराव फेंडर वय ४५ वर्ष, रा. राजेन्द्र वार्ड शुक्रवारी भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १४३,१४९,४४८,४५१,३७९,४२७,१९४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. गभणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) मेडीकल दुकानातील नगदी पैश्याची चोरी :—**

दिनांक १५/१२/२०१७ चे २०.३० वाजता ते १६/१२/२०१७ चे ०७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रविश यादवराव नंदनवार वय ४३ वर्ष, रा. राममंदीर वार्ड भंडारा यांचे मेडीकल स्टोअर्स दुकानाच्या शटर्सचे ताले कोणीतरी अज्ञात ईसमाने तोडुन कुणीही नसल्याची संधी साधुन दुकानातील काऊन्टर मध्ये ठेवलेले नगदी १५,०००/—रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४६१,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. राठोड पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकलचे नुकसान करुन जखमी केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/१२/२०१७ चे ०८.४५ वाजता दरम्यान यातील जखमी संजय शामराव कंळबे वय ५० वर्ष, रा. राजगोपालचारी वार्ड भंडारा हा मोटार सायकल क्र. एमएच ३७ सी ३३०८ ने भंडारा कडुन मुजबी कडे जात असतांना यातील आरोपी ट्रक चालकाने त्याच्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन तसेच रांगेच्या बाजुने येवुन फिर्यादीचे मोटार सायकल ला बेला येथे धडक मारुन मोटार सायकलचे नुकसान करुन व फिर्यादीस जखमी केल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. साकुरे पोस्टे भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. गायधने पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**४) संगनमत करुन शेतातील धानाचे पुंजण्याला आग लावुन जाळुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/१२/२०१७ चे ०१.०० ते ०६.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे शेतात ठेवलेल्या धानाचे पुंजण्याला आग लावुन १,५०,०००/—रु. चे जाळुन नुकसान केल्याने फिर्यादी सौ. मंगला रविंद्र माथुरकर वय ३८ वर्ष, रा. बोरगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ४३५,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.ना. चुटे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन पैश्यासाठी मारहान करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १३/१२/२०१७ ते १६/१२/२०१७ पर्यत यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस माहेरुन धंदया करीता ५०,०००/—रु. मागुन आण? असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करुन लाथा —बुक्याने व काठीने मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ४९८(अ),३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खंडाते पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत.

**६) घराचे खुल्या दाराततुन आत प्रवेश करुन सोन्याचे दागीण्यांची चोरी . :—**

दिनांक ०२/१२/२०१७ चे १६.०० ते ०३/१२/२०१७ चे ०६.०० वाजता दरम्यान यातील संशयीत महिला आरोपीने फिर्यादीचे राहते घराचे खुल्या दारातुन आत प्रवेश करुन फिर्यादीचे घरी हॅगरला लटकवुन ठेवलेल्या कुर्त्याचे खिशात लाल रंगाचा सुभाष कावळे ज्वेलर्स लाखनी असे लिहलेल्या मनी पर्स मध्ये ठेवलेले प्रत्येकी १० ग्रॅम, सोन्याचे सिक्के १० नग वजन १०० ग्रॅम, १ सोन्याचा गोप वजन १० ग्रॅम, २५ ग्रॅम, सोन्याचा गोप २ सरी त्यामध्ये साईबाबाचे छापा असलेला पदक ४ ग्रॅम  असा एकुण वजन १३९ ग्रॅम, एकुण किंमती ३,८८,५७५/रु. माल संशयीत महिला आरोपीने चोरुन नेल्याने फिर्यादी रघुनाथ इस्तारी भुते वय ८१ वर्ष, रा. सावरी मुरमाडी यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

**७) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक १६/१२/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मॅक्स गाडी ही दवाखाना चौक गोबरवाही येथे आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोउपनि. जाईले यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जाईले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**८) अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी .  :—**

दिनांक १६/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, जवाहरनगर, मोहाडी, पवनी व वरठी येथे अवैध दारू/जुगार अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ६७ लिटर हातभट्टी दारू + मोटार सायकल किंमती ४६,३००/—रु. व ३४७ लिटर ७६० मिलीलीटर देशी दारू+ १ ओमनी किंमती १,३८,९०४/—रु. असा एकुण १,८५,३५७ /रु. चा माल जप्त करण्यात आला.

**९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १६/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी — ०१ तीन सिटर वाहनांवरती — ०८ केसेस व ईतर वाहनांवरती —७० केसेस करण्यात आलेले आहे.

**(पोनी. बी.डी.बी.)**
**नियत्रंण कक्ष अधिकारी**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ९६६४००२२६४**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.